**BDC LIBRARY**

**News Paper Clipping**

**A.Y. 2025-26**

शुक्रवार, १३ मार्च २०२६

# बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये आजपासून राष्ट्रीय चर्चासत्र

*वार्ताहर*

पाटण

कोयना एज्युकेशन सोसायटीच्या येथील बाळासाहेब देसाई कॉलेज येथे शिवाजी विद्यापीठ व रवळनाथ हौसिंग फायनान्स तसेच वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने १३ व १४ रोजी 'पारंपरिक भारतीय खेळ' तसेच 'शारीरिक शिक्षणातील मनोरंजक उपक्रम' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवार १३ रोजी सकाळी १० वाजता प्राचार्य डॉ. व्यंकटेश वांगवाड यांच्या हस्ते तसेच कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली चर्चासत्राचे उद्घाटन होणार आहे. यावेळी संस्थेचे जॉईंट सेक्रेटरी डॉ. सुहास देशमुख, संचालक याज्ञसेन पाटणकर यांची उपस्थिती आहे.

या राष्ट्रीय चर्चासत्रात शारीरिक शिक्षणातील बदलते प्रवाह आणि पारंपरिक खेळांचे महत्त्व यावर चर्चा होणार आहे. यानिमित्ताने विविध राज्यातील शारीरिक शिक्षण तज्ज्ञ प्राध्यापक सहभागी होणार आहेत. बीजभाषक म्हणून प्रो.डॉ. सिंकू कुमार सिंग (नांदेड) व तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ. सॅम ब्रिगाझा (गोवा), डॉ. महेंद्र सावंत (केरळ), डॉ.मितेशकुमार वाघ (गुजरात), डॉ. आनंद श्रीनिवासन, व डॉ. महेंद्र कदम–पाटील उपस्थित राहणार आहेत.

शनिवार १४ रोजी दुपारी ३:३० वाजता प्र. प्राचार्य डॉ. व्ही. ए. कळंत्रे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप होणार आहे. यावेळी ज्येष्ठ शारीरिक शिक्षण तज्ज्ञ प्रा. बी. के. घाटगे मार्गदर्शन करणार आहेत. चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी प्र. प्राचार्य डॉ. व्ही. ए. कळंत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा. डॉ. सौ. हेमलता काटे, संयोजक सचिव प्रा. डॉ. दीपक डांगे–पाटील आदींसह सर्व प्राध्यापक व प्रशासकीय सेवकवर्ग व शारीरिक शिक्षण विभाग परिश्रम घेत आहे.